*A complete E-Journal Dedicated to Research*

IMPACT FACTOR
6.77 (SJIF)

ISSN ( P )-2250-253x

ISSN ( E )-2320-544x

# International Research Mirror

*(An International Peer Reviewed, Refereed, Indexed, Interdisciplinary, Multilingual,Monthly Research Journal)*

Month- FEBRUARY - 2022 Vol- I Issue-02

Chief Editor

**NEHA SINGH**
M.Tech

**Published By**
Captain Netram Singh Charitable Trust,

**www.ugcjournal.com/IRM**

**E-mail:**
**internationalresearchmirror@gmail.com**

**मुख्य सम्पादक का मानद पद कार्य पूर्णतः अवैतनिक है।**

इस शोध पत्रिका के प्रकाशन, सम्पादन मुद्रण में पूर्णतः सावधानी बरती गई है। किसी भी प्रकार की त्रुटि महज मानवीय भूल मानी जाये।

शोध पत्र की समस्त जिम्मेदारी शोधपत्र लेखक की होगी।उक्त जर्नल में प्रकाशन हेतु भेजे गए पेपर सामग्री का सम्पूर्ण नैतिक दायित्व पेपर लेखक का होगा। मुख्य संपादक ,प्रकाशक ,मुद्रक , पिअर रिविव्यु मंडल जिम्मेदार नहीं होगा। लेखकों से अनुरोध है किसी भी प्रकार की साहित्यिक चोरी न करें।

**समस्त विवादों का न्याय क्षेत्र जयपुर शहर ही होगा।**

1. Editing of the research journal is processed without any remittance. **The selection and publication is done after recommendation of Peer Reviewed Team, Refereed and subject expert Team.**
2. Thoughts, language vision and example in published research paper are entirely of author of research paper. It is not necessary that both editor and editorial board are satisfied by the research paper. **The responsibility of the matter of research paper is entirely of author.**
3. Along with research paper it is compulsory to sent Membership form and copyright form. Both form can be downloaded from website i.e. **www.ugcjournal.com**
4. In any Condition if any National/International university denies to accept the research paper published in the journal then it is not the responsibility of Editor, Publisher and Manangement.
5. Before re-use of published research paper in any manner, it is compulsory to take written acceptance from Chief Editor unless it will be assumed as disobedience of copyright rules.
   In case of plagiarism, the entire moral responsibility of the paper material will rest with the author only.
6. **The entire moral responsibility of the paper material sent for publication in the said journal will be that of the paper author. Chief Editor, Publisher, Printer, Peer Review and Refereed Board will not be responsible.**

**Authors are requested not to do any kind of plagiarism**

7. All the legal undertaking related to this research journal are subjected to be hearable at jaipur jurisdiction only.

# EDITORIAL BOARD OF OUR JOURNALS


## Patron

**Prof. Dr. Alireza Heidari**
***Full Professor And Academic Tenure, USA***

## Chief Editor

**NEHA SINGH**
Dr.Krishan Bir Singh

## Associate Chief Editor

Ravindrajeet Kaur Arora
S. Bal Murgan
Dr. Sandeep Nadkarni
Dr. A Karnan
Dr. S.R. Boselin Prabhu
Deepika Vodnala
Dr. Kshitij Shinghal
Christo Ananth
Gopinath Palai
Dr. Neeta Gupta
Dr. Vinita Shukla
Harold Jan R. Terano
Dr Sajid Mahmood
Dr Pavan Mishra

## Editor

Dr.H.B.Rathod
Dr.Kishori Bhagat
Dr. Mohini Mehrotra
Dr. Arvind Vikram Singh
Dr. Suresh Singh Rathore
Bindu Chauhan
Kamalnayan. B. Parmar
Dr.sanjay B Gore
Dr. A.karnan
Dr.amita Verma
Dr . Ity Patni
Dr. Somya Choubey
Dr.surinder Singh
Dr. Manoj S. Shekhawat,
Dr. Anshul Sharma
Dr. Ramesh Kumar Tandan
S N Joshi
Dr. Sant Ram Vaish
Dr. Vinod Sen
Dr. Sushila Kumari
Dr Indrani Singh Rai
Dr Abhishek Tiwari
Prof.S.K.Meena
Prof.Praveen Goswami
G Raghavendra Prasad

## International Advisory Board

Aaeid M. S. Ayoub
***Geotechnical Environmental Engineering***
Uqbah bin Muhammad Iqbal
***Postgraduate Researcher***
Badreldin Mohamed Ahmed Abdulrahman
***Associate Professor***
Dr. Alexander N. LUKIN
***Principal Research Scientist & Executive Director***
Dr. U. C. Shukla
***Chief Librarian and Assistant Professor***
Dr. Abd El-Aleem Saad Soliman Desoky
***Professor Assistant***
Prof. Ubaldo Comite
***Lecturer***
Moustafa Mohamed Sabry Bakry
Dr Sajid Mahmood

Shameemul Haque


International Research Mirror

Dr. Dnyaneshwar Jadhav
Akshey Bhargava
Dr. A. Dinesh Kumar
Dr. Pintu Kumar Maji
Dr Hanan Elzeblawy Hassan
Sandeep Kumar Kar
Dr.R.devi Priya
Dr.P.Thirunavukarasu
Dr. Srijit Biswas
Parul Agarwal
Dr. Preeti Patel
Archana More
Dr. Harish N
Dr. Seema Singh
Dr. Ram Singh Bhati
Dr. Pankaj Gupta
Dr Arvind Sharma
Dr. Ramesh Chandra Pathak

Dr. Ankush Gautam
Dr Markandey Dixit
Dr. Manoj Kumar
Ratko Pavlovi, Phd
Dr.S.Mohan
Dr Ramachandra C G
Dr.Sivakumar Somasundaram
Dr. Sanjeev Kumar
Dr. Padma S Rao
Dr Munish Singh Rana
Dr. Piyush Mani Maurya

## Associate Editor

Dr. Yudhvir Redhu
Dr.Kiran B.R
Dr Richard Remedios
Dr. R Arul
Anand Nayyar
Dr . Ekhlaque Ahmad
Dr. Snehangsu Sinha
Dr Niraj Kumar Singh

Sandeep Kataria
Dr Abhishek Shukla
Somesh Kumar Dewangan
Amarendra Kumar Srivastav
Dr K Jayalakshmi
Dilip Kumar Jha

## Assistant Editor

Jasvir Singh
Dr.pintu Kumar Maji
Dr. Soumya Mukherjee
Prof Ajay Gadicha
Ashutosh Tiwari
Gyanendra Pratap Singh
Jitendra Singh Goyal
Ashish Jaiswal
Hiten Barman
Dr. Priti Bala Sharma

## Subject Expert

Dr. Jitendra Arolia
Dr. Suresh Singh Rathore
Dr.kishori Bhagat
Dr Mrs Vini Sharma
Ranjan Sarkar
Chiranji Lal Parihar
Dr. Lalit Kumar Sharma
Dr Amit Kumar
Santosh Kumar Jha
Dr . Ekhlaque Ahmad
Naveen Kumar Kakumanu
Dr. Chitra Tanwar
Jyotir Moy Chatterjee
Somesh Kumar Dewangan
Raffi Mohammed
Dr. Sunita Arya
Dr. Ram Singh Bhati
Dr. Janak Singh Meena
Dr. Neha Kalyani

International Research Mirror

Dr. Rajeev Nayan Singh
Dr. Pankaj Rathore
Dr. Mahendra Parihar
Pradip Kumar Mukhopadhyay
Dr Vijay Gaikwad

## Research Paper Reviewer

Dr. B H Kirdak
Amit Tiwari
Dr Dheeraj Negi
Dr. Shailesh Kumar Singh
Dr. Meeta Shukla
Dr. Ranjana Rawat
Sonia Rathi
Dr.Anand Kumar
Dr.Pardeep Sharma
Anil Kumar
Dr. Deepa Dattatray Kuchekar
Dr Ade Santosh Ramchandra

## Guest Editor

Dr. Lalit Kumar Sharma
Dr. Falguni S. Vansia

## Chief Advisory Board

Ashok Kumar Nagarajan

## Advisory Board

Dr. Naveen Kumar
Manoj Singh Shekhawat
Pranit Maruti Patil
Vishnu Narayan Mishra

international Research Mirror

Month-February-2022

Vol- I

Issue- 02

Subject - History

**International Research Mirror**

*( International Level Double Blind Peer Reviewed, Refereed,Indexed, Multilingual, Interdisciplinary, Monthly Research Journal)*

ISSN (P) : 2250-253X
ISSN (E) : 2320-544X
Impact Factor : 6.77 (SJIF)

# कृषी विद्यापीठाचे शिल्पकार : श्री वसंतराव नाईक

( Sculptor fo Agriculture University: Sri Vsaantrao Naik)

प्रा. डॉ. मोतीराज रामदास चव्हाण

भिवापूर महाविद्यालय, भिवापूर जि. नागपूर

international Research Mirror

**सामान्य सारांश**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक यांनी महाराष्ट्रात कृषी विद्यापीठ स्थापन करून कृषी आणि हरितक्रांतीच्या विकासात राज्यातील कृषी विद्यापीठाने महत्वाची भूमिका बजावली आहे. वसंतराव नाईक यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या काळात राहुरी,अकोला,परभणी आणि दापोली या चार ठिकाणी कृषी विद्यापीठ स्थापन करण्यात आली. एकाच वेळी चार विद्यापीठे स्थापन करण्याची आपल्या देशातील पहिलीच घटना होय. त्यामुळेच वसंतराव नाईक यांना कृषी क्षेत्राच्या विकासाचा महामेरू म्हटल्या जाते.

## प्रस्तावना :

भारताच्या राजकीय रंगमंचावर अलीकडे अनेक कर्तबगार राजकीय नेते उदयास आले आहेत त्यांपैकी श्री.वसंतराव नाईक हे एक होत. मा. वसंतराव नाईक यांची ओळख 'हरितक्रांतीचे प्रणेते' म्हणून संपूर्ण महाराष्ट्रालाच नव्हे,तर देशाला आहे. 5 डिसेंबर 1963 रोजी मुख्यमंत्री पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर नाईक साहेबांना नैसर्गिक तसेच मानवनिर्मित संकटांना तोंड द्यावे लागले. मुख्य म्हणजे सुरूवातीच्या काळातच राज्यातील अन्नटंचाईचा प्रश्न गंभीर बनला. रेशनसाठी स्वस्त धान्याच्या दुकानावर लांबच–लांब रांगा लागत. अमेरिकेत गुरांना खाऊ घालण्यात येणारी,आयात केलेली लाल रंगाची मावलो ज्वारी लोकांना नाइलाजाने खावी लागत असे. ही भीषण समस्या पाहताना नाईक साहेब अंतर्मुख झाले आणि अन्नटंचाईची समस्या कायमस्वरूपी सोडविणसाठी कृषी विज्ञानाला चालना देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य नाईकसाहेबांच्या हातून घडले.

महाराष्ट्रातील चार स्वतंत्र कृषी विद्यापीठांची स्थापना हा निर्णय ना. वसंतराव नाईक यांच्या शेतीवियक वैज्ञानिक दृष्टिकोनाचा सर्वोच्च कळस होता. भारत सरकारच्या शिक्षण विभागाने 1964–65 च्या दरम्यान कोठारी आयोगाची नेमणूक केली होती. या कोठारी आयोगाने शेतीसुधारणेच्या कार्यक्रमाला अग्रक्रम द्यावा, आणी शिफारस करताना असेही सुचवले होते की, प्रत्येक राज्यात किमान एक कृषी विद्यापीठ असावे, तथा कृषी विद्यापीठाचे स्वरूप, त्याची कार्यकक्षा याबाबतच्या स्पष्ट सुचना कोठारी आयोगाने दिल्या होत्या. कृषीक्षेत्रात संशोधन,अध्यापन व कृषीसेवा अशा त्रिसूत्रीद्वारे शेतीसुधारण्याचा संकल्प केला गेला.

## लघुशोध निंबधाची उद्दिष्टे:

1.वसंतराव नाईक यांच्या कारकिर्दीत निर्माण झालेल्या कृषी विद्यापीठाचा अभ्यास करणे

2.आजच्या काळात कृषी विद्यापीठाचे महत्व किंवा त्याचे परिणाम समजून घेणे.

## लघुशोध निंबधाची व्याप्ती:–

त्याच्या अभ्यासाची व्याप्ती वसंतराव नाईक यांच्या कृषी कार्याने प्रकट होईल– कृषी विद्यापीठाचे शिल्पकार,पण प्रत्यक्षात वसंतराव नाईक यांनी कृषी क्षेत्रात केलेले कार्य आजच्या आयुष्यात आपल्या सर्वांसाठी काहीतरी धडा आहे.

## अभ्यासाची पध्दत :–

हे संशोधन पुस्तके,नियतकालिके,समृध्दीच्या वाटा,दूत पर्जन्याचा, हिरवी क्षितिजे,वसंत वैभव,चतुरस्त्र, महानायक,सामान्यातील असामान्य इ. पुस्तके तसेच वसंतराव नाईक यांच्या भाषणाचा संग्रह, आणि इंटरनेटवरून दुययम डेटा संकलनावर आधारित आहे.

## अभ्यासाच्या मर्यादा:–

हा विषय केवळ अफाट नाही तर त्यामध्ये कृषिक्षेत्रांचा महासागर देखील समाविष्ट आहे. संशोधन हे काही प्रमुख मुद्दे,शैली आणि विषयांपुरते मर्यादित आहे.

## कृषी विद्यापीठे :

जपानसारख्या लहान राष्ट्राने आधुनिक व यांत्रिक पध्दतीने शेतीचा विकास केला आहे. अमेरिकेचेही शेतीचे उत्पादन मोठया प्रमाणावर आहे. भारतासारख्या अविकसित राष्टाला उत्पादनवाढ ही आवश्यक बाब आहे. भारत हा शेतीपधान देश असून लोकसंख्येच्या मानाने शेतीचे उत्पन्न फार कमी आहे, इतर उत्पन्नाच्या बाबींप्रमाणे देशाच्या अर्थव्यवस्थेत शेतीला फार महत्व आहे. शेतीचा विकास झाला तर अन्नधान्यच उपलब्ध होईल असे नसून राष्ट्रातील अनेक उद्योगधंद्यांना लागणारा कच्चा मालही शेतीउत्पादनातून मिळू शकेल. यासाठी शेतीचा विकास होणे क्रमप्राप्त आहे.

भरघोस पीक देणारे ज्वारीचे संकरित वाण कृषी शास्त्रज्ञांनी शोधून काढताच या वाणाचा प्रसार व प्रचार करण्यासाठी त्यांनी महाराष्ट्रभर दौरे काढले. स्वतःच्या शेलू–गहुली येथील शेतात संकरित ज्वारीचे भरघोस उत्पादन काढून शेतकऱ्यांसमोर यशस्वी प्रयोगाचा आदर्श उभा केला. महाराष्ट्रातील शेती अधिक समृध्द होण्यासाठी नवीन वाण बी–बियाणे, आधुनिक तंत्रज्ञान याची गरज असल्याचे त्यांच्या लक्षात आले. ही बाब लक्षात घेऊन त्यांनी महाराष्ट्रात एक नव्हे, तर चार कृषी विद्यापीठांची स्थापना केली. ही संपूर्ण

भारताच्या इतिहासातील पहिली घटना आहे. त्यामुळे शेती आणि शेतकऱ्यांवर निस्सीम प्रेम करणाऱ्या नाईक साहेबांचे नाव कृषी विद्यापीठांचे शिल्पकार म्हणून नोंदविले गेले.

महाराष्ट्र विधान परिषदेत 5 जुलै 1967 ला महाराष्ट्राचे माजी शेतकी मंत्री श्री. पी. के. सावंत म्हणाले की, देशातील शेतीचा विकास कोणत्या पध्दतीने करता येईल हे ठरविण्यासाठी भारत सरकारने कै.डॉ. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली एक आयोग नेमले. त्या आयोगाने सन 1959 ला आपल्या अहवालात देशातील सुविद्य व सुसंस्कृत नागरिक निर्माण करण्याचा उद्देश बाळगून ग्रामीण विद्यापीठ स्थापण्याची शिफारस केली होती. या शिफारसीच्या सूचनेतून कृषि विद्यापीठाच्या कल्पनेचा उगम झाला होता. भारत अमेरिका या दोन संयुक्त पथकांनी शेतीविषयक पहाणी केली होती. या पथकांनी आपले अहवाल सादर केले व त्यांनी देखील डॉ. राधाकृष्णन शिफारसींचा पाठपुरावा केला. या पथकाने आणखी असे सुचविले आहे की, अमेरिकेत सध्या सुरू असलेल्या लॅंड ग्रॅन्ट कॉलेजच्या कृषि विद्यालयाचा अनुभव लक्षात घेता, देशातील प्रत्येक राज्यात स्वतंत्र कृषि विद्यापीठे सुरू झाले पाहिजेत.

विज्ञानाची जोड मिळाल्यास शेतीचे उत्पादन वाढेल व विकास कार्याला गती येईल. या शिफारसीनुसार कार्यवाही करण्यापूर्वी अधिक मार्गदर्शन लाभावे म्हणून भारत सरकारने डॉ. क्युमिंग्ज यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती. या समितीने 1964 ला आपल्या अहवालात कृषि विद्यापीठाची रूपरेखा, कार्यपध्दती आणि व्याप्ती याबद्दल मौलिक सूचना केल्या होत्या. डॉ. कोठारी मंडळानेही कृषि विद्यापीठ स्थापन करण्याची शिफारस केली. त्याचप्रमाणे महाराष्ट्र सरकारने राज्यासाठी एक कृषि विद्यापीठ स्थापन करण्याचा निर्णय घेतला. महाराष्ट्राच्या विधीमंडळाने हा कृषि विद्यापीठविषयक कायदा 6 सप्टेंबर,1967 ला संमत केला.

### कृषी विद्यापीठे स्थापनेमागील उद्देशः

महाराष्ट्र राज्यातील शेती व्यवसायाचा शास्त्रीय पायावर विकास व्हावा, अन्नधान्याच्या उत्पादनात वाढ होऊन राज्य स्वयंपूर्ण व्हावे, दरएकरी उत्पादन वाढवावे,शेतकऱ्यांचे जीवन सुखी व समृध्द व्हावे, ग्रामीण भागातील जनतेचे चित्र वदलावे, कृषिऔद्योगिक समाज सहकारी पध्दतीची कास धरून पुढे यावा हा या कृषि विद्यापीठ कायद्याचा मुख्य उद्देश होता. त्याचप्रमाणे सध्याच्या विज्ञान युगात शेती शास्त्रात आणि तंत्रात फार प्रगती झाली आहे. शेतीच्या उच्च शिक्षणाबरोबरच इतर थरातील शेतकऱ्यांना शास्त्रीय पध्दतीचे शिक्षण देणे अत्यावश्यक आहे. त्यांना शास्त्रीय शिक्षण देऊन ष्शेतीउत्पादनवाढीस चालना देणे हाच कृषि विद्यापीठ स्थापन करण्यामागचा उद्देश आहे. हे विद्यापीठ शेतकऱ्यांचे, शेतकऱ्यांनी आणि शेतकऱ्यांसाठी चालविलेले विद्यापीठ असावे असे शासनाचे ध्येय व धोरण होते.

### महाराष्ट्राचे पहिले कृषि विद्यापीठ– राहुरी

महाराष्ट्राचे पहिले कृषि विद्यापीठ गुणवत्तेच्या आधारावर अहमदनगर जिल्हयात राहुरी येथे 29 मार्च 1968 ला स्थापन करण्यात आले. गुणवत्तेच्या आधारावर हे कृषि विद्यापीठ विदर्भात स्थापन न करता ते पश्चिम महाराष्ट्रात स्थापन केल्याने विदर्भात असंतोष निर्माण झाला. सरकारने विदर्भावर अन्याय केला आहे. शासनाचा हा निर्णय चुकीचा आहे, विदर्भाला डावलून राहुरी येथे कृषि विद्यापीठ उघडण्यात आले अशीशासनावर टीका झाली व या निर्णयाविरूध्द विदर्भात जोरदार लढा सुरू झाला. विद्यार्थ्यांनी आंदोलन सुरू केले. विदर्भातील ष्शेतीची जमीन, पाऊस, दळणवळणाची साधने राहुरीपेक्षा सरस आहेत असे पटवून देण्याचा प्रयत्न आंदोलनवाल्यांनी केला.

आंदोलनात अनेक विद्यार्थ्यांना अटक करण्यात आली. वित्तहानी झाली. पोलिसांना गोळीबार करावा लागला. विदर्भ कृषि विद्यापीठ संघर्षातील नेते श्री. जांबुवंतराव धोटे यांना अटक झाली. हे आंदोलन चार महिने चालले होते. त्यामुळे महाराष्ट्रात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला होता. त्याचे पडसाद विधानसभेत उमटले होते. परंतु वसंतराव नाईक यांनी सडेतोड स्पष्टीकरण दिले होते. एवढेच नव्हे तर वसंतराव नाईक पश्चिम महाराष्ट्राला अधिक धार्जिणे आहेत असा त्यांच्यावर आरोप करण्यात आला होता.

कृषी विद्यापीठामुळे संपूर्ण महाराष्ट्राला त्याचा लाभ होईल अशी वसंतराव नाईक यांची व्यापक भूमिका होती. पण विकास कार्यात राजकारण आडवे आले. त्यामुळे वसंतराव नाईक हे न डगमगता धीरोदात्तपणे या सगळया समस्येला तोंड देवून राज्यकारभार केला. 1968 मध्ये राहुरी येथे पहिल्या कृषि विद्यापीठाची स्थापना नाईकसाहेबांनी केली. या विद्यापीठात भरघोस फळ पिकांसाठी उपयुक्त संशोधन करण्यात आले. गणेश डाळंबाची जात याच विद्यापीठाची देण आहे. आज या विद्यापीठातून डाळंब पिकाचे तंत्रज्ञान विकसित करण्यात आले असून, त्याचा लाभ संपूर्ण महाराष्ट्राला होत आहे.

महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरीनंतर अकोला येथे विद्यापीठाची मागणी करण्यात आली. या मागणीसाठी आंदोलनाने



International Research Mirror

उग्ररूप धारण केले. मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी या मागणीचा स्वीकार करून 1969 साली अकोला येथे कृषी विद्यापीठ स्थापन करण्याचा निर्णय घेतला आणि नंतर या विद्यापीठाला विदर्भाच्या अमरावती जिल्हयातील केंद्रीय कृषिमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांचे नाव देण्यात आले. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ आता विदर्भात कृषी संशोधनात अग्रेसर बनले आहे. या विद्यापीठातून कृषी, फलोद्यान, कृषी अभियांत्रिकी व वनशास्त्र वा विद्याशाखांमधील विज्ञान स्नातक ही पदवी बहाल करण्यात येते. तसेच या विषयातील पदव्युत्तर शिक्षणही दिले जाते. विद्यापीठातून सतत संशोधन सुरू असते. बुलढाणा, अकोला,वाशिम,अमरावती व यवतमाळ या जिल्हयातील माती परीक्षणाचे कार्य या विद्यापीठात होते. याशिवाय कापूरस, ज्वारी या पिकांवरील संशोधन सुरू असते.

राहुरी आणि अकोला पाठोपाठच परभणी येथे मराठवाडयातले पहिले कृषी विद्यापीठ उभारण्याचा निर्णय वसंतराव नाईक यांच्या नेतृत्वाखालीच घेतला गेला. अकोल्याच्या विद्यापीठामुळे विदर्भाला विद्यापीठ मिळाले. राहुरी विद्यापीठाच्यारूपाने पश्चिम महाराष्ट्रात व परभणीच्या विद्यापीठाने मराठवाडयाचे कृषी विद्यापीठ उभे राहिले. मराठवाडाच्या कृषी विद्यापीठातून तृणधान्य,व खरीप पिकांचे संशोधन मोठया प्रमाणावर होते. वसंतराव नाईक यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आता या विद्यापीठाचे नामकरण आता 'वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ असे झाले आहे. हे कार्य पृथ्वीराज चव्हाण यांच्या कारकिर्दीत संपन्न झाले.

त्यानंतर दापोली येथे 'बाळासाहेब सावंत कृषी विद्यापीठ स्थापन करून वसंतराव नाईक यांनी महाराष्ट्राचा विभागीय समतोल अतिशय कुशलपणे सांभाळला आहे. आज या चारही विद्यापीठांतून कृषीक्षेत्रात संशोधन,शिक्षण आणि प्रशिक्षण या माध्यमातून शेती विकासाचा मंत्र शेतकऱ्यांना गवसला आहे. या चारही कृषी विद्यापीठांचे संशोधन हळूहळू आता शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचले आहे. कृषी विद्यापीठांच्या संशोधनातून भरघोस पीक देणाऱ्या पिकांच्या नवीन जाती,नवीन बियाणे उपलब्ध होत आहे. मुख्य म्हणजू खत व्यवस्थापन, जल व्यवस्थापन, कीड नियंत्रण याचे मार्गदर्शन विद्यापीठांद्वारे होत असल्याने शेतीला समृध्दी लाभत आहे. याचे सारे श्रेय वसंतराव नाईक यांनाच देता येईल.

''कृषी विद्यापीठ'' आंदोलन हे वसंतराव नाईक यांच्या नेतृत्वाला अनेक आव्हानांपैकी एक आव्हान होय. या आंदोलनाच्या वेळी त्यांच्या नेतृत्वाची कसोटी होती. कृषी विद्यापीठ आंदोलन त्यांनी आपल्या नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे कौशल्याने व धूर्तपणाने हाताळले होते. त्यांच्या नेतृत्वाची यावेळी ही कसोटी लागली होती. राज्याच्या नेत्याला दूरदृष्टी असली की, शास्त्रीय पध्दतीने शेती कशी करता येते, हे वसंतराव नाईक यांनी दाखवून दिले. देशाच्या कुठल्याही मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या कार्यकाळात त्या त्या राज्यातल्या भागात जवळपास एकाचवेळी चार कृषी विद्यापीठे उभी करण्याचा विक्रम फक्त वसंतराव नाईक यांनीच केला आहे. ते नुसते 'नाईक' नव्हते, तर राज्यायचे खरे 'पाईक ' होते. म्हणूनच त्यांना कृषी विद्यापीठांचे शिल्पकार म्हणता येईल.

## निष्कर्ष–

वसंतराव नाईक यांनी कृषी विद्यापीठ स्थापन केल्यामुळे संपूर्ण महाराष्ट्राच्या ष्शेतकऱ्यांना किती प्रमाणात फलप्राप्ती झाली हे तपासून पाहणे सोयाचे हाईल. शेती विद्यापीठांपुरता विचार करता, शेती विषयातील पदवीधरांना रोजगार मिळण्याच्या बाबतीत कालांतराने काही अडचण निर्माण होऊ नये. याचे कारण असे की, पारंपरिक विद्यापीठे'नोकऱ्या' या गोष्टीला देतात तेवढे महत्व देण्याऐवजी आधीच शेतीमध्ये पडलेल्या व्यक्तींना अधिक शिक्षण देऊन त्यांच्या गरजांच्या संदर्भात त्यांना प्रशिक्षित करणे हे येथले उद्दिष्ट असायला हवे, अलग विद्यापीठ स्थापन करण्यामुळे प्राध्यापक, आणि संषोधक, म्हणून पुन्हा विद्यापीठाकडे परतणे एवढेच उद्दिष्ट असता कामा नये.खरे तर आपल्या प्रगत तांत्रिक ज्ञानानिशी त्यांनी शेताकडे पावले वळवायला हवीत. आपले ज्ञान शेतामध्ये उपयोगात आणल्यावर आणि तिथे समोर ठाकणाऱ्या व्यावहारिक अडचणींचा अनुभव गाठीशी बांधल्यावर आपल्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी त्यांनी विद्यापीठाकडे परत यावे. दुसऱ्या बाजूने विद्यापीठालाही त्यांच्या अनुभवाचा फायदा मिळेल आणि त्या त्या विषयाबाबत झालेल्या अद्ययावत घडामोडींची माहिती विद्यापीठ त्याला देऊशकेल. हा केवळ एकमार्गी व्यवहार न राहाता त्याला देवाणघेवाणीचे स्वरूप आले तर विद्यार्थी व विद्यापीठ या दोघांना आणि त्याश्विय देशालाही त्यापासून लाभ होईल.

## संदर्भ–


1) कर्णिक, मधू मंगेश, 'दूत पर्जन्याचा', प्रकाशक– नरेंद्र तिडके (अध्यक्ष),वसंतराव नाईक कृषी संशोधन व ग्रमीण विकास प्रतिष्ठान, मुंबई, प्रथमावृत्ती–26 जानेवारी 1994. पृश्ठ क्र. 13
2) पठाण, यु. म., 'हिरवी क्षितिजे', प्रकाशक– नरेंद्र तिडके (अध्यक्ष),वसंतराव नाईक कृषी संशोधन व ग्रमीण विकास प्रतिष्ठान मुंबई, द्वितीय आवृत्ती 18 ऑगस्ट 1987. पृष्ठ क्र. 6
3) रूद्रावार, उत्तम, 'महाराष्ट्राचे वसंत वैभव', प्रकाशक– डॉ. एन. पी. हिराणी, पुसद जि. यवतमाळ प्रथमावृत्ती– जुलै 1992. पृष्ठ क्र.97
4) पाटील, पंढरीनाथ, 'सामान्यातील असामान्य',प्रकाशक– आशादेवी पंढरीनाथ पाटील,मुंबई.1975 पृष्ठ क्र.77
5) नाईक, वसंतराव–'आवाहन',प्रकाशक–दिनेश नागेश देसाई,पारिजात प्रकाशन,मुंबई–1971.
6) संचालक, प्रसिध्दी संचालनालय,सचिवालय, मुंबई. 'लोकराज्य' जुलै–2009.


international Research Mirror